नोव्हेंबर ७२

# कोल्हापूर येथे संततिनियमनाची सोय

**सिद्ध क्लिनिक, कोल्हापूर.** या संस्थेच्या व्यवस्थापकांकडून पुढील विनंतिपत्र आलें आहे:—

आम्ही या ' क्लिनिक् 'ची माहिती दैनिक सकाळ; सत्यवादी, कोल्हापूर; ऐक्य, सातारा; पुढारी, कोल्हापूर; या पत्रांत प्रसिद्ध केली, परंतु ज्या मानाने लोकांनी याचा फायदा घ्यावा तसा घेतला नाही. यासाठी आपले मासिकांत या संस्थेची प्रसिद्धि कराल तर बरें होईल.

या संस्थेस सरकारची अगर म्युनिसिपलिटीची वगैरे कोणाचीच मदत नाही. ' सिद्ध क्लिनिक् ' म्हणून मुख्यतः गरिबांसाठी येथे धर्मार्थ दवाखाना आहे, व तो डॉ. श्री. अप्पामहाराज पंडित, एम्. बी. बी. एस् ( कोल्हापूरचे राजगुरु घराण्यांतील विद्वान व निःस्वार्थी गृहस्थ ) हे चालवीत असतात. त्यांस डॉ. व्ही. जी. गोगटे, एल्. सी. पी. एस्. व डॉ. मिस् एडिथ डीसिल्व्हा, एल्. सी. पी. एस्, यांची मदत आहे.

अद्यापि फारशी प्रसिद्धि नसलेने व लोकांचा गैरसमज दूर होणेस वेळ लागतो यामुळे आतांपर्यंत सर्व काम फुकटच केलें आहे. खालील दर येथील व बाहेरील पुरुषांचें शस्त्रक्रियेकरतां आहेत. ऑपरेशन गरिबांस फुकट आहे व दवाखान्यांत ' इन्डोअर पेशंट् ' म्हणून ४–५ दिवस फुकट ठेवून घेतलें जाईल. मध्यम वर्गास ५ रु. पर्यंत औषधाचा चार्ज म्हणून घेतला जाईल व शिवाय दवाखान्यांत ' इन्डोअर पेशंट ' म्हणून ठेवून घेतलें जाईल. श्रीमान वर्गास एकंदर खर्च १० ते २५ घेतला जाईल. या बाबतींत कोणतीही सक्ती नाही.

---

**रोगप्रतिबंधक.** कोलंबियामधील ' काली ' नांवाच्या शहरांत गुप्तरोग-प्रतिबंधाचा एक चमत्कारिक उपाय अंमलांत आणलेला आहे. तो असा कीं रोगी

वेश्यांना इस्पितळांतून सोडतांना त्यांच्या जननेंद्रियावरील केंस काढून टाकतात आणि शहरांतील लोकांस हस्तपत्रकांनीं जाहिर केलेलें असतें की अशा वेश्या रोगी समजाव्या (प्रेस मेडिकॅल). अर्थात् रोग पुरा बरा होईपर्यंत त्यांना इस्पितळांत ठेवण्याचें कारण नसतें आणि त्यास खर्चही फार येईल. **संपादक.**

---

**मिठाचा उपयोग.** आपण अन्नाबरोबर जें मीठ खातों त्याचा काय उपयोग होत असावा हें शोधून काढण्याकरता अनेक प्रकारचे प्रयोग करून असें आढळलें कीं पिठूळ पदार्थ, साखर वगैरेच्या पचनाकरता मिठाचा उपयोग होतो. चावतांना पिठूळ पदार्थांत लाळ मिसळल्यामुळें त्याची साखर बनते आणि त्यांत कांहीं विशिष्ट प्रमाणांत मीठ घातलेलें असल्यास ही क्रिया जास्त जलद होते. मिठाचा हा परिणाम होण्यास त्याचें किमान प्रमाण ३०००:१ असावें लागतें व तें ८०:१ इतकें असलें तरी चालतें. परंतु यापेक्षा कमी किंवा जास्त असल्यास मात्र हा परिणाम होत नाही. यावरून मीठ मुळीच न खाणेंही बरें नव्हे असें दिसतें. कोणाला मीठ कमी लागतें व कोणाला जास्त लागतें, परंतु तें या मर्यादेंत बसतें की नाही तें प्रयोग करून ज्याचें त्यानें ठरवावें. ('प्रेस् मेडिकल' वरून).

**पडसें.** पडशाचा जंतु शोधण्याचा प्रयत्न अनेकांनी केला आहे, परंतु आता असें सिद्ध झालें आहे की पडशाचें विष गाळणकागदांतून सुद्धा पलीकडे जाऊं शकतें. पडसें झालेल्या माणसांपासून दूर रहाणें हा संसर्ग टाळण्याचा एक उपाय आहे, परंतु तें कदाचित् लहान मुलांचे बाबतींत शक्य झालें तरी मोठ्या माणसांस शक्य नसतें. पिचकारीनें नाक किंवा घसा धुण्याचा उपयोग होत नाही आणि उलट परिणाम होण्याचा मात्र संभव असतो. देवीप्रमाणे पडशाची लस टोंचल्याचाही कांही उपयोग नाही. थंडीने स्वसंरक्षणशक्ति कमी झाल्यामुळें संसर्गाचा संभव वाढतो, ह्मणून या अर्थानें थंडीमुळे पडसें होतें असें म्हणतां येईल. तेव्हां थंडीपासून संरक्षण करावें. ('प्रेस् मेडिकॅल' वरून).

---

———:०:———

( ' डोळ्यांची निगा ' या लेखमालेंतील एक प्रकरण )

लेखक, डॉ. के. भा. लेले, पुणें,

१. **किडके केंस** ( ब्लेफॅराइटिस् ) स्वरूपः—या विकारांत पापणीच्या किनारीला कंड, सूज व लाली असते. शिवाय त्या भागांतून पू, लस अथवा रक्त वाहतें. ही लस वाळली म्हणजे केसाच्या बुडाशीं खपली धरते. किडके केस गळून पडतात.

**कारणें.** लेखक, शिंपी, घड्याळवाले इ. जवळचें पाहण्याचीं कामें करणें, अंधुक प्रकाश, दारिद्र्य, अस्वच्छ व रोगट राहणी, कारण असूनही चष्मा न वापरणें, दारू पिणें, व तंबाखू ओढणें. याशिवाय नाकाचा, कानाचा व डोक्यावरील केसांचा विकार, डोळ्यांतील ओलाव्याचा निकाल न होणें, मानेला गांठी असणें.

**उपचार.** कारण शोधून त्यावर उपाय करावा. प्रकृति सुधारावी, कोठा साफ ठेवावा. पापणीस पाऱ्याचें पांढरें मलम काजळाप्रमाणें लावावें. हा विकार चेंगट आहे, म्हणून गुण आल्यावरही कांहीं दिवस उपचार चालू ठेवावा.

२. **रांजणवाडी** ( स्टाय ). स्वरूपः—या विकारांत पापणीच्या केसाच्या मुळाशीं कृमिसंपर्क झालेला असतो, यामुळें तेथे लाली व सूज येऊन लहानसें गळूं बनतें.

**कारणें.** डोळे येणें, नाकांतील गांठी, पीनस, रोगट प्रकृति, बद्ध कोठा, चष्मा न वापरणें, इ.

**उपचार.** आधणाच्या पाण्यांत बोरिकची पूड टाकून त्यानें डोळा शेकावा आणि मागाहून तेथील पू काढण्याकरतां चाकूने लहानसा छेद करावा.

**३. पापणींतील गांठ** ( मायबोमिअन् सिस्ट् ). स्वरूपः–ही गांठ पापणीच्या आंतील गुलाबी भागांत बनते व तिच्या मध्यें फुटलेल्या दुधाप्रमाणे पातळ पदार्थ सांपडतो. एका वेळीं लहानमोठ्या अनेक गांठी उद्भवतात व त्या बाहेरून लहानशा टेंगळाप्रमाणे दिसतात आणि बोटाला टणक लागतात. या गांठी दुखत नाहीत, परंतु पापणीला जड वाटतात.

**कारणें.** वरीलप्रमाणें. **उपचार.** लहान गांठ आपोआप वितळते, परंतु मोठी होऊन ती दुखूं लागली तर आंतल्या बाजूने छेद करावा.

**४. पापणी पडणें** ( टोसिस ). स्वरूपः—या विकारांत पापणी उघडतां येत नाही, यामुळे दोन्ही डोळ्यांना विकार असल्यास समोर पाहण्या करतां डोकें मागें झुकवून भुवया वरती चढवाव्या लागतात.

**कारणें.** आनुवंशिक अथवा मागाहून होणारे विकार, तरुण मुलींना येणारे झटके ( हिस्टेरिआ ), अर्धांगवायु, स्त्रियांचें प्रौढ वय, म्हातारपण, इ.

**उपचार.** गरमी व संधिवात असल्यास त्यांवर उपचार करावा, विजेचे उपचार, शस्त्रक्रिया. ‘ टोसिस ’ चष्मे बाजारांत मिळतात.

**५. पापणी आंत फिरणें** ( एन्ट्रोपिअन् ). स्वरूपः–हा विकार विशेषतः वरच्या पापणीचा आहे. या वेळीं आंत फिरलेले केस बुबुळावर घासल्यामुळे तेथे चरे पडतात व बुबुळाला सूज येऊन तें किंचित् पांढरें दिसूं लागतें, डोळ्यांत एकसारखें खुपतें, बुबुळाभोंवती लाली येते, डोळ्याला गळ लागते व प्रकाश सहन होत नाहीं. बुबुळ पूर्ण पांढरें झालें म्हणजे दृष्टिनाश होतो.

**कारणें.** खुपरी असल्यास तिच्यावर उपाय करावा. शस्त्रक्रियेने पापणी बाहेर फिरवून घेतां येते. पापणीच्या आंत एक पातळ लवचीक चकती असते ती या विकारांत जाड होऊन वांकलेली असते. तीच काढून टाकावी.

**६. पडकेस** ( ट्रिकिॲसिस् ). स्वरूपः—वरीलप्रमाणें, परंतु सौम्य आहे, कारण यावेळीं सबंध पापणीऐवजी कांही केस आंत फिरलेले असतात. केस कांट्याप्रमाणे बोंचतात.

**उपचार.** बोंचणारे केस उपसून काढावेत व दुसराही कांही विकार असल्यास त्यावर उपचार करावा.

**७. पापणी बाहेर फिरणें** ( एक्ट्रोपिअन् ). स्वरूपः—या विकारांत पापणीची किनारी बाहेर वळते व ती विशेषतः खालच्या पापणीची असते. यामुळे पापणीचा गुलाबी भाग उघडा पडतो, त्याला सूज येऊन तो काळानिळा दिसूं लागतो. गालावरून अश्रू ठिबकत राहतात.

**कारणें.** आजारानंतर पापणी वांकडी होऊं शकते. म्हातारपणीं या भागांत अशक्तता येते अथवा तोंडाला जाळपोळ झाल्यानंतर असा प्रकार होत असतो.

**उपचार.** कारण शोधून योग्य उपचार करावा.

**८. खुपऱ्या** ( ग्रॅन्युलर् लिड्स् ). स्वरूपः—डोळ्यांच्या विकारांत खुपऱ्यांचा पहिला नंबर लागतो. याचें कारण हा विकार पूर्ण बरा होणारा नाही, आणि शिवाय खुपऱ्यांमुळे इतर अनेक रोग उद्भवतात, खुपरीची पापणी जाड असते व ती उलटून पाहिली असतां आंतल्या बाजूला लहानमोठे तांबडे दाणे दृष्टीस पडतात. हे दाणे जुनाट झाले म्हणजे चिवट बनून राखी निळसर दिसतात. हा विकार विशेषतः वरच्या पापणीला आहे. या विकारांत डोळे आल्याप्रमाणे सर्व लक्षणें होतात. यामुळें डोळे दुखतात, खुपतात, प्रकाश सहन होत नाही, व डोळ्याला गळ लागलेली असते. याशिवाय खुपरीमुळें पापणीचे केस आंत फिरणें व त्यामुळे बुबुळावर होणारे परिणाम, इ. सर्व प्रकार मूळ खुपऱ्यांमुळे होणारे आहेत.

**कारणें.** या विकाराचीं अनेक कारणें सांगण्यांत येतात, परंतु उष्ण प्रदेशांत खुपरी अधिक सांपडते हें खरें आहे.

**उपचार.** स्वच्छता व डोळयांचें आरोग्य यांकडे विशेष लक्ष द्यावें आणि खुपऱ्यांवर चांदीचें कॉस्टिक, मोरचूत, अथवा तुरटी यांचा उपयोग करावा. अर्थात् हा उपाय डाक्तराने करावयाचा आहे.

---

# नग्नतेचा अनुभव

:०:

( लंडन येथील 'प्लॅन्' मासिकावरून )

सूर्यस्नानाने पुष्कळांच्या जीवनांत अवर्णनीय क्रांति होते यांत शंका नाही. या बाबतींत कोणाजवळ वादविवाद करून मोठासा परिणाम होत नाही. अशा एखाद्या ठिकाणीं जाण्याकरता त्याचें मन वळवलें पाहिजे. एकदां कोणी अशा ठिकाणीं गेला की तो त्यांत सांपडलाच. तेथे गेलेला मनुष्य आनंदाने त्यांत स्वतः शिरला नाही, असें माझ्या पांच वर्षांच्या अनुभवांत कधींही झालें नाही. त्यांत मी कसा गेलों याची मला अजून आठवण आहे. एका व्याख्यानानंतर कांहीं लोक क्रॉयडन्च्या पलीकडे एक सूर्यस्नानाची छावणी पहायला गेले, त्यांत मीही गेलों. अर्थात् मीही प्रथम कोणत्याही नवशिक्याप्रमाणे भीतभीत, साशंक मनानेच गेलों, आणि तो दिवस जवळ येत चालला तशा माझ्या शंकाही वाढतच गेल्या. आपल्याला कितपत चमत्कारिक वाटेल, आपलें शरीर इतरांच्या इतकें चांगलें नाही याची जाणीव राहील काय, असह्य कामोद्दीपन होईल काय, हे सगळे लोक वेडे असतील काय, नग्न स्थिति आपल्याला आवडेल काय, आपल्याला बावळटासारखें वाटेल काय ? तेथे गेल्यावर एक चमत्कार झाला. कपडे काढण्यासाठीं तेथे एक आसरा केला होता, तेथे जाऊन आम्ही कपडे काढले आणि मनाचा धडा केला. आम्हाला माहीत होतें की कुंपणाच्या पलीकडे सर्व लोकांचा जमाव होता आणि तेथे जाण्यांतच खरें धाडस होतें. त्या आवारांत पाऊल टाकीपर्यंत माझ्या सर्व शंका कायम होत्या, पण आंत पाय टाकतांक्षणींच त्या एकदम नाहीशा झाल्या. एकतर आमच्या कल्पनेपेक्षां तें सगळें फारच वेगळें होतें. आपण कसे दिसत असूं हें मनांत येऊन लाज वाटण्याऐवजी सर्वजण आपआपल्या उद्योगांत गर्क होते. कांही बसून गप्पा मारीत होते, कांही धुरकटत वर्तमानपत्र वाचीत होते, कांहीजण 'रग्बी फूटबॉल'सारखा एक दंगामस्तीचा खेळ खेळत होते (यांत नंतर माझ्या अंगाचीं सालें गेलीं), कांही एका डबक्यांत डुंबत होते आणि कांही मुलें इकडेतिकडे खेळत

होतीं. कोणाच्याही अंगावर एक चिंधी देखील नव्हती. ते मित्रभावाने बोलत होते, पण फाजील सलगी करीत नव्हते. त्यांचें वर्तन साधें होतें, त्यांत कृत्रिमपणा नव्हता. एक मनुष्य कांहीं जमीन साफ करीत होता. तो म्हणाला, ' छान आहे हवा, नाही ? एवढे दगड काढायला लागतां का ? ' आणि मी लागलों. मला बिलकुल लाज वाटत नाहींशी झाली, आणि अगदीं घरच्यासारखें वाटलें. तुम्हांला कदाचित् वाटेल की हें सगळें खरें, पण ही एका मनुष्याची गोष्ट झाली. पण सर्वांची अशीच स्थिति होते हें मी अनुभवाने सांगतों. अर्थात् मी त्या संघांत शिरलों आणि नंतर इतरहि संघांत शिरलों, आणि दक्षिण फ्रान्समधल्याही एका संघाचा मी घटक आहें. त्या सर्वांत एक गोष्ट सारखी दिसते, की त्यांतील लोक सामान्य जनतेपेक्षा सुखी व निरोगी दिसतात. त्यांत सर्व दर्जांचे आणि धंद्यांचे लोक असतात. ते कोणत्याही बाबतींत चमत्कारिक नसतात, म्हणजे त्यांना सूर्यस्नान आवडतें यापेक्षा त्यांच्यांत कांही वैशिष्ट्य नसतें. ते कोणत्याही राजकीय पक्षांतले असतात. ते साध्या जीवनाचेहीं पुरस्कर्ते नसतात.

कोणी म्हणेल हें सर्व ठीक आहे, नग्नतेपासून नुकसान नाही इतकं समजलें, पण त्यापासून फायदा काय ? पहिला फायदा म्हणजे आरोग्य. सूर्यस्नान करूं लागल्यापासून माझी प्रकृति कितीतरी सुधारली. याबद्दल पुरावा देणें म्हणजे उघड्या दरवाजावर ठोठावणें आहे, तरीपण ' एन्साइक्लोपीडिआ ब्रिटॅनिका ' मधून पुढील उतारा देतों. " योग्य तऱ्हेने सूर्यस्नान केल्यास शरीरप्रकृति तर सुधारतेच, पण मनावरही त्याचा परिणाम चांगला होतो. सूर्यस्नान करणारे लोक नेहमी अधिक आनंदी असतात आणि त्यांच्या मनाचे व्यापार अधिक जलद आणि जास्त प्रमाणांत होतात. "

या बाबतींत रॉलिए च्या ' दी सन् क्यूअर् ' या पुस्तकाची मी शिफारस करतों. त्यांत कित्येकांचीं सूर्यस्नानापूर्वीचीं, सूर्यस्नानाचीं, आणि नंतरचीं, अशीं चित्रें दिलीं आहेत; तीं फारच आश्चर्यकारक आहेत. सूर्यस्नान करणाराची त्वचा अधिक चांगली होते. त्वचेचा नेहमींचा थंड सागोतींतील चरबीचा रंग ( अर्थात्

यूरोपीयांचा ) जाऊन त्याऐवजी अत्यंत आल्हादकारक बदामी रंग येऊं लागतो, मनुष्याची अंगलट आणि गति बदलते, शरीर अधिक मोकळें होतें. मनाविषयीं म्हटलें तर माझा अनुभव असा आहे की मला कसल्याही काळज्या असल्या तरी मी कपडे काढून उन्हांत पडलों की त्या नाहीशा होतात. मनाला विश्रांति देण्यास इतर कोणताही मार्ग इतका यशस्वी नाही. सूर्यस्नानानें कामोत्तेजन होतें हें खोटें. त्यांत कामवासनेचा संबंधच येत नाही. या वेळीं कामवासनेची जाणीव सर्वांत कमी असते.

सूर्यस्नानाने आपल्या बऱ्याच कल्पना बदलतात, आणि पूर्वी ज्या गोष्टी महत्वाच्या वाटत होत्या त्या नंतर वाटत नाहीत. उदाहरणार्थ अश्लीलतेची कल्पना घ्या. मनुष्याचें सर्वच शरीर अश्लील आहे, की फक्त कांहीं भाग अश्लील आहेत ? तसें असलें तर कोणते भाग अश्लील ? कांहीं भाग इतरांपेक्षा जास्त अश्लील आहेत काय ? स्त्रीचें शरीर पुरुषाच्या शरीरापेक्षा अधिक अश्लील आहे काय, आणि असलें तर कां ? किंवा स्त्रीच्या शरीराचा जास्त भाग अश्लील असतो ? आणि असल्यास कोणता ? सूर्यस्नान करणाराला हे सर्व प्रश्न म्हणजे पोरकट मूर्खपणा वाटतो. अश्लीलतेची भीति झुगारून दिल्यापासून आपल्या बायकोची व मुलांची प्रकृति सुधारली हें तो जाणतो, आणि नग्नतेची चोरटी भीति मनाला वाटत नाहीशी झाल्यापासून मनाला अधिक समज येऊन समतोलपणा वाढतो.

इतरांची राहोच, पण कांहीं सूर्यस्नान करणारांचीही अशी कल्पना असते की नग्नता हा नैसर्गिक जीवनाचा एक भाग आहे, आणि या लोकांचा प्रयत्न आधुनिक सुधारणेपासून दूर जाण्याचा आहे. परंतु ही कल्पना खरी नाही. रानटी जीवन परत आणण्याच्या इच्छेने याला सुरवात केलेली नाही. प्रत्येक गोष्टीची योग्य किंमत आणि महत्व ओळखून ही जाणीव जीवनांत आणण्याची ही खटपट आहे. समाजांत प्रचलित असलेल्या कल्पना किती निरर्थक आहेत हें यावरून समजूं लागतें. कित्येक ठिकाणीं, समुद्रस्नानाकरतां नवराबायकोंनी एकाच पेटींत कपडे बदलल्यास चालतील काय, असा विचार गंभीरपणाने चाललेला असतो; तर

कित्येक स्नानगृहांत स्नानाचा पोषाख घालून शिवाय आंत चड्डी घालावी लागते. रोममधील पोपच्या राजवाड्यांतून मला एकदां हांकून दिलें होतें, कारण मज-बरोबरच्या स्त्रीने बिनबाह्यांचें पोलकें घातलें होतें. या सर्व गोष्टींचा विचार करतां मला असें वाटतें की युरोपीय लोक आफ्रिकेंतल्या रानटी लोकांकडे ज्या तुच्छ-तेने पाहतात, त्याच दृष्टीने सूर्यस्नान करणारा मनुष्य असले नियम करणारांकडे पाहतो. **ए. ए. बी.**

---

# शहाणपणा

——:o:——

## ( **गी द मोपॅसां** वरून )

ब्लेरो आणि मी लहानपणापासूनचे दोस्त. आमचा एकमेकांवर इतका विश्वास होता कीं आम्ही आपल्या प्रेमकथा सुद्धां एकमेकांपासून लपवून ठेवीत नव्हतों. त्याने जेव्हा आपल्या लग्नाचा बेत मला सांगितला, तेव्हा मला मोठा धक्का बसला, त्याने आपला विश्वासघात केला असें वाटलें. आमच्या स्नेहांत बायको आड येणार हें दिसत होतें. नवराबायकोंत प्रेम नसलें तरी देखील बिछा-न्यांतल्या सलगीमुळें एक प्रकारचें बंधन उत्पन्न होतें आणि एकमेकांना पाठिंबा देण्याची त्यांची नेहमी तयारी असते. पण जर का बायकोला एखादा उपपति उत्पन्न झाला तर मात्र हें बंधन बरेंच ढिलें होतें.

अर्थात् मी लग्नाला गेलोंच. त्याच्या बायकोला मीं पूर्वी कधीं पाहिलें नव्हतें. ती उंच व किडकिडीत असून तिचे केस, गाल, हात, डोळे, सर्व कांहीं फिकट रंगाचें होतें, आणि तिची चालण्याची ढब आकर्षक होती. ब्लेरोचें तिच्यावर फार प्रेम असावेंसें दिसलें. तिला पाहून माझ्याही मनाची चलबिचल झाल्याशिवाय राहिली नाही.

कांही दिवसांनी मी त्याला भेटायला गेलों. तो म्हणाला. ' मी किती सुखी

आहें याची तुला कल्पनाही येणार नाही. मी प्रेमांत सांपडलों आहे खरा, पण ती काय आहे, म्हणतोस ! " आणि पुढें वर्णन करतां येईना म्हणून त्यानें आपलें बोटें ओठाला लावून एका चुंबनानें वाक्य पुरें केलें. मी हंसत म्हणालों, " हं ! अगदीं इतकें ? " तो उत्तरला, " अरे, तें कांही विचारूं नको. "

त्याने तिची व माझी ओळख करून दिली. ती माझ्याजवळ अगदी मोकळे-पणानें वागली आणि " हें घर आपलेंच समजा " असें म्हणाली. तरीपण आपला मित्र आता कांही आपला राहिला नाही, असेंच माझ्या मनाने घेतलें, आणि आम्ही एकमेकांजवळ फारसे बोललों देखील नाहीं.

मी तेथून निघालों आणि लवकरच पौर्वात्य देशांत पर्यटनास गेलों, आणि सुमारें दीड वर्षाने रशिआ, जर्मनी, स्वीडन्, हॉलंड्, अशा मार्गानें पॅरिसला परत आलों. दुसऱ्याच दिवशीं सकाळीं मी हवा खायला बाहेर पडलों, तों समोरून एक गाल बसलेला, फिकट चेहऱ्याचा मनुष्य येतांना दिसला. तो जवळ आला तेव्हा मीं त्याला ओळखला. ब्लेरो पूर्वी चांगला सशक्त, भरींव आणि लालसर रंगाचा होता, पण त्याचीच आतां अशी दशा झाली होती. मी आश्चर्यानें त्याच्या-कडे पहात राहिलों, पण इतक्यांत तोही मला पाहून हात पसरून पुढें आला, आणि आम्ही भररस्त्यांत एकमेकांना आलिंगन दिलें. कांहीं वेळ इकडेतिकडे फिरल्यावर तो थकल्यासारखा दिसला, तेव्हा मी म्हटलें " तूं कांही बरा दिसत नाहीस. आजारी आहेस की काय ? " " हं, नीटसें बरें नाही वाटत. " तो मरणोन्मुख माणसासारखा दिसत होता आणि त्या एकुलत्या एका मित्राविषयी माझें प्रेम उसळून आलें. मी त्याचे दोन्ही हात धरून विचारलें, " तुला काय होतें. आहे ? कोठे दुखतें का आहे ? "

—थोडासा थकलों आहें झालें. विशेष कांही नाही.

—तुझा डाक्तर काय म्हणतो ?

—तो ॲनीमिआ म्हणतो, आणि त्याने लाल मांस खायला आणि लोह घ्यायला सांगितलें आहे.

मला शंका आली आणि मी विचारलें, " तूं सुखी आहेस का ? "

—अत्यंत सुखी. माझी बायको म्हणजे रत्न आहे, आणि तिच्यावरचें माझें प्रेम वाढतच चाललें आहे.

पण मी पाहिलें कीं रस्त्यांत माझ्या प्रश्नांची उत्तरें द्यायला त्याला कांही बरें वाटत नव्हतें. तेव्हां मी त्याचा हात धरून त्याला एका कॅफे मध्यें ढकलला. तेथे त्यावेळीं कोणीच नव्हतें.

—हें पहा, ब्लेरो, हें कांही चालायचें नाहीं. मला सगळें खरें सांग.

—सांगायला कांही नाहीच आहे.

—हें साफ खोटें आहे. तूं आजारी आहेस खास. कदाचित् कांही मानसिक व्याधि असेल, आणि तें तुला कबूल करायला नको आहे. कशामुळें तरी तुझें नुकसान होतें आहे आणि मला तें कळलेंच पाहिजे. हं, आटप. मी वाट पाहतों आहे.

त्याचा चेहरा लाल झाला आणि तो तोंड फिरवून म्हणाला, " सांगितलें तर लोक वेडा म्हणतील, पण मी ठार मेलों."

तो तेथेच थांबला असें पाहून मी म्हणालों, " हं, सांग सगळें."

—काय सांगूं ? माझी बायको मला मारते आहे.

—अरे ? याचा अर्थ काय ? बायकोवर तुझें प्रेम आहे म्हणालास ना ?

—हो ( तो लाजेने मान खाली घालून म्हणाला ), पण तें प्रेम फाजलि आहे.

मला हंसूंच फुटणार होतें, पण तें मोठ्या प्रयासाने दाबून मीं म्हटलें, " अरे, मग तें थोडें कमी नाही का करतां येत ? "

शेवटी त्याने एकदा जिवाचा धडा करून मला मोकळेपणाने सर्व सांगितलें. " तें शक्य नाही. मी मरतों आहें हें मला समजतें, आणि भीतिही वाटते. कधीकधी कोठेतरीं लांब पळून जावें असेंही वाटतें, पण संध्याकाळ झाली म्हणजे मीं आपला पुनः घरीं जातों आणि घंटा वाजवतों. ती म्हणते ' किती उशीर केलात हा ? ' आणि आम्ही जेवायला बसतों. जेवतांना सुद्धां

मी मनांत म्हणतों, ‘ जेवल्याबरोबर सांपडेल त्या गाडीनें वाटेल तिकडे जाईन. ’ पण जेवण झाल्यावर मला जायचा धीर होत नाहीं. आणि मग आणखी एक रात्र जाते. ”

मला स्मितल्याशिवाय राहवेना. तो तें पाहून म्हणाला, “ तूं हंस, पण माझी स्थिति भयंकर झाली आहे. ”

—पण तूं तिला सांगत कां नाहीस ? तिच्यांत कांही माणुसकी असली तर तिला खात्रीनें समजेल.

—तुला बोलायला काय होतें ? मी तिला कसें सांगूं ? तो तिचा स्वभाव आहे. अमुक बाईनें तिसरें लग्न केलें असें ऐकलें, म्हणजे तुम्हाला हंसायला येतें. पण करणार काय ? यांत तिचीही चूक नाही आणि माझीही नाही. तिला निसर्गानें जशी बनवली, तशी ती आहे. आपणांत इतर बायकांपेक्षा कांही निराळें आहे, हें तिला माहीत नाही, पण ती अत्यंत कामुक आहे. तिला वाटतें हें असेंच असायचें. मला समजतें, पण मी कसें सांगणार ? ती इतकी मोहक आणि मायाळू आहे की माझ्यानें तें होत नाही. मी दररोज जोराचे निश्चय करतों, कारण माझा प्राण हळूहळू जातो आहे हें मला दिसतें. पण तिनें एकदां माझ्याकडे पाहिलें की माझा निश्चय मनांतच राहतो आणि मी म्हणतों, ‘ जाऊं दे, आतां हें शेवटचेंच. उद्यांपासून बंद.’ पण पुनः तेंच. काल मी कबरस्तानांत गेलों आणि तेथली थडग्यांची रांग पाहिली, आणि आपणही येथें लवकरच येणार अशी माझी खात्री झाली· मी घरीं जाऊन आजारी पडल्याचें ढोंग करायचें ठरवलें, पण माझ्या हातून तें झालें नाही. तंबाखू ओढणाराला विचार ! आपण विष घेत आहों हें त्याला माहीत असतें, पण त्याची संवय सुटत नाही. शेवटीं तो म्हणतो तंबाखू सोडण्यापेक्षा मेलेलें बरें. तसेंच माझें झालें आहे. यांतून कांही सुटका नाही.

त्यानें उठून हात पुढें केला. त्याच्या भयंकर बायकोवर मी इतका संतापलों होतों, की मी काय बालतों याचें मला फारसें भान नव्हतें. तो डगल्याच्या

गुंज्या घालीत होता तों मीं त्याला म्हटलें, " हें पहा अशा रीतीनें मरण्यापेक्षां तूं तिला दुसऱ्या कोणाची ओळख कां नाही करून देत ?"

त्याने नुसते खांदे उडवले आणि तो चालता झाला. यानंतर सहा महिने-पर्यंत आमची भेट झाली नाही. त्याच्या स्मशानयात्रेकरतां बोलावणें येईल याची मी दररोज वाट पहात होतों. पण त्याच्याबद्दल आणि त्याच्या बायकोबद्दल मला इतका तिटकारा आणि राग येत होता, की मी त्यांना भेटायला गेलों नाही.

नंतर एकदां मी सहज सकाळीं फिरायला गेलों असतां माझ्या खांद्यावर कोणीं मागून थाप मारली, आणि मागें वळून पाहतों तो माझा मित्र ? पण कसा ? पुन: सुदृढ, भरीव, आणि लालसर ! त्याचा चेहरा प्रसन्न दिसत होता आणि माझे दोन्ही हात धरून तो म्हणाला, " अहो, आपली स्वारी होती कोठे इतके दिवस ? " मी त्याला पाहून थक्क झालों आणि म्हणालों, " अरे व: ! तुझा आजारबिजार गेला वाटतें सगळा ? " "हं-अं, ठीक आहे आतां साधारण." माझी दृष्टि त्याच्यावरून हालेना. हें पाहून त्याला जरा चमत्कारिक वाटत होतें. मी पुढें म्हणालों, " पण आतां तूं...चांगला बरा झालास का ? " " हो, अगदीं छान. तूं भेटलास, बरें झालें. भेटत जा की कधीकधी ! " पण मी त्याचा पिच्छा सोडला नाही. मी म्हणालों, " पण तूं मला सहा महिन्यांपूर्वी जें सांगि-तलेंस, त्याचें काय ? आतां कसें काय होतें ? " " तें जाऊं दे रे ! आतां नको तो विषय, पण मी तुला तसा सोडणार नाहीं. माझ्याकडे जेवायला कधी येतोस ?" मला जिज्ञासा होतीच, आणि वस्तुस्थिति प्रत्यक्ष पहायला ही संधि चांगली होती, तेव्हां मी ताबडतोब त्याच दिवशीं जायचें कबूल केलें.

त्याच्या बायकोने माझा चांगला सत्कार केला, आणि ती खरोखरच फार मोहक होती यांत शंका नाही. माझ्या मित्रानें तिच्या कपाळाचें चुंबन घेतलें आणि म्हणाला, " ल्यूसिॲं अजून आला नाहीं वाटतें ? " ती म्हणाली, "नाही, तो थोडा उशिरां येतो, तुला माहीतच आहे. " इतक्यांत घंटा वाजली आणि एक उंच, भरीव, आणि काळी दाढीवाला मनुष्य आंत आला. त्याचें नांव ल्यूसिॲं

दलबार, असें सांगून ब्लेरोने त्याची ओळख करून दिली, आणि आम्ही जेवायला बसलों.

जेवण मोठ्या आनंदांत झालें, आणि सर्वजण मोकळेपणाने बोलत होतीं. मी मधूनमधून दलबारकडे आणि ब्लेरोच्या बायकोकडे चोरून पहात होतों. त्यांची वागणूक अत्यंत सभ्य होती, पण तीं दोघेंही एकमेकांकडे चोरून पहात होतीं असा मला भास झाला. जेवण झाल्याबरोबर ब्लेरो बायकोला म्हणाला, ' प्येर मला फार दिवसांनी भेटला आहे. मी त्याच्याबरोबर जरा फिरायला जाऊन येतों." ती माझ्याकडे वळून स्मितून म्हणाली, "यांना फार वेळ नका बाहेर ठेवूं."

बाहेर पडल्यावर मला पुनः विचारल्याशिवाय राहवलें नाही, "मग एकंदरींत झालें काय ? मला सांगशील की नाही ?" "हें पहा, तूं फार प्रश्न विचारतोस बुवा ! मी तसाच हळहळ खंगत जाऊन मेलों असतों तर तो मूर्खपणाच नव्हे का ?"

मी त्याला जास्त सतावला नाही, मी समजलों. कांही वेळ चालल्यावर तो म्हणतो, "चला, आपण त्या पोरींना गांठूं आणि थोडीशी बिअर घेऊं या. येतोस ?" मी म्हणालों, "चल बापडा, जाऊं या."

---

# वेडाचें विडंबन-२.

लेखक, ' अभिसारक, ' कानपूर.

**देवमंदिरें व देवमूर्ति.** या ठिकाणीं आणखी एक गोष्ट आठवली ती अशी की श्रीमान बिडला शेठजींनी कलकत्यास एक मंदिर स्वतःच्या पैशानें व प्रयत्नानें उभारलें आहे. याही मंदिराच्या उद्‌घाटन समारंभास म. गांधींसह मोठमोठी मंडळी उपस्थित झाली होती. आतांपर्यंत स्थापित झालेल्या हिंदु :मंदिरांतील

मूर्तीहून यांत एक निराळें वैचित्र्य आहे. तें असें की एका बाजूला ध्यानस्थ शंकराची मूर्ति बसवली आहे व दुसऱ्या बाजूला गौतमबुद्धाची ध्यानस्थ मूर्ति स्थापित केली आहे. यांत दोन धर्मसंस्थापकांच्या मूर्ति स्थापन करण्याचा हेतु असावा, पण बुद्ध जसा बौद्ध धर्माचा संस्थापक आहे, तसा शंकर महादेव हा कांही शैव धर्माचा संस्थापक नाही. तो फक्त त्या धर्माचा देव आहे, आणि जर इतर धर्माच्या संस्थापकांच्या मूर्ति हिंदुधर्मीयांना आपल्या मंदिरांत सहन होऊं लागल्या व पूज्य वाटूं लागल्या तर मुसलमानी धर्माचा संस्थापक महम्मद याची मूर्ति—एका हातांत सुरा आणि एका हातांत कुराण घेऊन ' कुराणाचा स्वीकार कर, नाहीतर उरांत सुरा भोंसकतों ' असा भाव चेहऱ्यावर दाखविणारी मूर्ति-कां स्थापन केली नाही ? तसेंच ख्रिस्ती धर्माचा संस्थापक जीझस ख्राइस्ट याची सुळावर चढवलेली दीनवदन मूर्ति, किंवा पारशी धर्माचा संस्थापक झोरास्टर याची हातांत अग्निज्वाला घेतलेली आग्यावेताळासारखी मूर्ति कां स्थापन करूं नये ? अगोदर धर्म हेंच मुळीं वेड, त्यांत पुनः हिंदुधर्मांत आजपर्यंत किती तरी, म्हणजे अश्वमेध, पुरुषमेध वगैरेच्या धर्मापासून तों थेट ' अहिंसा परमो धर्मः ' वाल्या बुद्धजिनादिकांच्या धर्मांतील देवता, याशिवाय खंडोबा, भैरोबा, जखाई, मखाई, ताबूत, पीर, वगैरे पुरत नाही म्हणून हे गांधळलेले परधार्जिणे लोक आणखी नवीन मूर्तींची भर घालीत आहेत. मग वैदिक धर्मांतील किंवा शाक्तवाममार्गांतील भगदेवता, तसेंच शैवधर्मांतील लिंग कां स्थापन करूं नये ? किंबहुना याच्याही पुढे जाऊन अभिसारक असें म्हणेल की ज्याचा महिमा वेदपुराणादिकांतून व सगळयाच धर्मग्रंथांतून या नाही त्या प्रकाराने वर्णिला आहे, ज्याच्या किंचिन्मात्र स्फुरणाने प्राणिमात्राच्या अंतःकरणांत गुदगुल्या होऊं लागतात, ज्याच्या योगाने सर्व संसार प्रेममय, आनंदमय वाटूं लागतो, मोठमोठे विश्वामित्रासारखे तपस्वी मेनकेच्या मागे देहभान विसरून चक्कर फिरूं लागतात, ज्याविषयी कालिदास म्हणतो, ' धनुः पौष्पं मौर्वी मधुकरमयी चंचलदृशां । दृशां कोणो बाणः सुहृदपि जडात्मा हिमकरः ॥ स्वयं चैकोऽनंगः सकलभुवनं व्याकुलयति । अशा त्या चराचरविश्वव्यापी मदनदेवाची सुहास्य मुखकमल, हातांत

चूतकलिका, कुसुमबाण, इत्यादि आयुधें धारण केलेली मनोवेधक मूर्ति कां स्थापन करूं नये ? याकरतां शेवटी आपण तर हेंच म्हणणार की ' योजकस्तत्र दुर्लभः ' एकीकडे हे धर्मभोळे नवीन नवीन मूर्ति स्थापन करून स्वर्गांतील गंधर्वांचें कर्णमधुर गायन आणि लावण्यवती अप्सरांच्या सहवासाचीं चित्रें पहात आहेत, तर दुसरीकडे दुसरे धर्मभोळे यांच्या मूर्ति फोडून, मंदिरें उद्ध्वस्त करून, बहिश्त आणि तेथील हूरें व गिल्में यांच्या समागमाच्या आशेने आनंदित होत आहेत. आहे की नाही दुनिया दुरंगी ?

**पुनर्जन्म.** तसेंच एक पुनर्जन्माचें वेड. मथुरेच्या शांतिदेवीच्या प्रकरणानंतर लागोपाठ अनेक ठिकाणीं पूर्वजन्मींच्या कथा सांगणाऱ्या मुलांच्या बातम्या आल्या. ती एक वेडाची साथच आली होती, पण त्या वेळीं पुण्याच्या श्री. प्रज्ञानेश्वर यतींनी थप्पड लगावली म्हणून बरीच मंडळी शुद्धीवर आली. त्यानंतर ' चित्रमय जगत् ' सारख्या सनातनी मासिकांत, पुनर्जन्म नाही असें सांगणारा एक लहानसा लेखही येऊन गेला. हा पुनर्जन्म या लोकांच्या खाजगी समजुती आणि पोथ्यापुराणांतच आहे म्हणून बरें, नाहीतर जर का पुनर्जन्म सरकारी कोर्टांनी मान्य करायला सुरवात केली, तरमग खमंग गव्हाची पुरणपोळी खूप पिकली म्हणून समजा. मग एखाद्या गुंडोबांनी एखाद्या भोळोपंतांची सुंदर, साजूक बायको माझी पूर्वजन्मींची बायको आहे म्हणून सांगावें आणि त्यांनी साध्या रीतीने हवालीं केली नाही तर कोर्टांतून हुकूमनामा घेऊन तिला राजरोस बगलेंत मारावी. भोळोपंतांच्या पुण्याईने सध्या प्रसंग टळला आहे.

**भूतपिशाचें.** पुनर्जन्माला कोर्टाने मान्यता अजून दिली नसली तरी हडळीला मान्यता देण्याचा पागलपणा एका कोर्टाने केल्याचें उदाहरण मात्र नुकतेंच घडलें आहे. एका जोडप्याचें नुकतेंच लग्न झालें होतें, लग्नानंतर हें जोडपें एका चाळींत रहावयास गेलें. पुढें नवरा रात्रीचा भलत्याच वेळीं घरांतून उठून जाऊं लागला व तेथल्या लोकांनी बायकोला सांगितलें की या चाळींत

मागच्या दालनांत एक हडळ राहते आणि तिनें आजपर्यंत अनेक तरुणांना नादीं लावून अनेक तरुणींच्या संसाराचा नाश केला आहे. तेव्हा तिने नवऱ्यावर पाळत ठेवली आणि एका रात्रीं खरोखरच तिचा नवरा एकटाच मागच्या दालनांत येरझारा घालीत असलेला दिसला. ती हडळ तिला दिसली की नाहीं कोण जाणे, पण दुसऱ्याच दिवशीं तिने कोर्टात दावा लावला की माझा नवरा एका हडळीच्या नादीं लागला आहे, तेव्हा मला त्यापासून काडी मोडून मिळावी. आणि आश्चर्य असें की कोर्टाने तिचें ह्मणणें खरें मानून तिला घटस्फोटाचा हुकूम दिला. ही गोष्ट आपल्या अमाग्या हिंदुस्थानांत घडलेली नसून सुधारलेले म्हणणाऱ्या एका यूरोपांतील देशांत घडलेली आहे. आपल्या देशांत ही मामुली गोष्ट आहे. अशा कित्येक घटनांना मजिस्ट्रेटचीं आणि पोलिस आफिसरांचीं सर्टिफिकिटें मिळालेलीं आहेत. त्यांतील एक फारच आश्चर्याची आहे. एका मासिकांत एका गृहस्थाने आपले अमेरिकेंत जाऊन राहिलेले सुप्रसिद्ध महाराष्ट्रीय वैज्ञानिक प्रो. भिसे यांचीं स्वदस्तूरचीं पत्रें मराठींत भाषांतर करून छापलीं होतीं. त्यांतील तात्पर्य असें की प्रो. भिसे यांची पहिली पत्नी वारली. त्यानंतर त्यांनी दुसरें लग्न केलें. या दुसऱ्या पत्नीच्या अंगांत येऊं लागलें, त्यावर भिसे महाशयांनी पुष्कळ औषधी उपाय केले, पण गुण आला नाहीं. शेवटीं त्यांनी तिला एका दूरच्या गांवी एका देवीच्या मंदिरांत नेली, तेथें मांत्रिकाने मंत्रतंत्र करून तिचें भूत काढलें. त्याने सांगितलें की झाडाला पहिली सवत लागली होती. यानंतर तीं दोघे अमेरिकेंत गेलीं. आहे की नाही पागलखान्यांत जाण्यासारखी गोष्ट ? ऋषि महाराजांचें प्लँचेट हेंही असेच एक वेड आहे. स्वर्ग, नरक परलोक, हीं सर्व याच वेडाच्या शाखाउपशाखा, आहेत. 'वाजे पाऊल आपलें, म्हणे मागें भूत आलें '( तुकाराम ).

भुतासारखेंच जादूचें एक वेड आहे. अमकी कपालकुंडलाबाई जादू करीत असते, ती डाकीण आहे, म्हणून सरकारी अधिकाऱ्यानें तिला मृत्युदंड दिला, अशा प्रकारच्या बातम्या आजच्या प्रमाणवादी कालांतही वाचण्यांत येतात. ऑस्ट्रेलियांतील एका युरोपिअन गृहस्थाने एका बाईच्या मुलाला पगाराऐवजी मार दिल्यामुळे तिने कांही मंत्र म्हणून आपल्या हातांतील नागमोडी काठी

त्याच्या अंगावर फेकली आणि तेव्हापासून तो जाईल तेथे त्याच्या मागे साप लागले, आणि शेवटी त्याला त्या बाईला शरण जावें लागलें आणि तिला पैसे वगैरे दिल्यावर ती शांत झाली, अशी हकीकत वाचली. तीवर कितपत विश्वास ठेवावा याचा निकाल डॉ. लेले देतील तर उपकार होतील. 'अभिसारक' असल्या बातम्यांवर कधीच विश्वास ठेवीत नाही. त्याचा फक्त एका जादूवर मात्र विश्वास आहे आणि तो म्हणजे जयदेवाच्या शब्दांत 'शशिमुखि तव भाति भंगु भ्रूर्युवजनमोहकरालकालसर्पी । तदुदितभयभंजनाय यूनां त्वदधरसीधुसुधैव सिद्धमंत्रः ॥ हे चंद्रवदने, तुझी सर्पाकार भ्रूवल्ली तरुणजनांना मूर्छित करणारी भयंकर काळी नागीणच की काय अशी शोभत आहे आणि त्या कालसर्पीच्या भयापासून बचाव होण्याकरतां एकच सिद्धमंत्र आहे आणि तो कोणता तर तुझ्या अधराचें आसव हेंच अमृत. ( अपूर्ण )

---

# पत्रव्यवहार

—xox—

१.

आपणाकडे पुढील दोन पुस्तकें पाठवीत आहे, त्यांवर मत देण्याची कृपा करावी. (१) डॉ. वा. का. किर्लोस्कर यांचें 'विवाहसंस्थेचा इतिहास' आणि (२) महादेवशास्त्री दिवेकर यांचें 'नवयुग विद्यार्थीधर्म.' आपला **ज्ञानच्लु.**

१. हें पुस्तक फ्रेड्रिक एंजल्स् यांच्या ग्रंथाच्या आधारानें लिहिलें असें त्याचे प्रस्तावनेंत सांगितलें आहे. मूळ ग्रंथ आम्ही वाचला नसल्यामुळे यांतील चुकीच्या विधानांबद्दल जबाबदार मूळ ग्रंथकार की डॉ. किर्लोस्कर, हें आम्हाला निश्चित सांगतां येत नाहीं. जबाबदार कोणीही असो, आम्हास दिसतात त्या चुका आम्ही दाखवतों. ऐतिहासिक दृष्ट्या यांत दिलेली माहिती सामान्यतः बरोबर आहे असें समजण्यास हरकत नाही. वाद काय तो मीमांसेसंबंधी आहे, पारंपरिक समजुती अजीबात बाजूला ठेवणें किती कठिण आहे, हें या लिखाणावरून स्पष्ट दिसतें. त्यांपासून अलिप्त राहण्याचा लेखकाचा प्रयत्न निःसंशय आहे, प

तो पूर्णतः यशस्वी झालेला नाही. समाजाच्या एका स्थितींत टोळींतील सर्व लोकांत स्त्रीपुरुषव्यवहार समाईक होता, म्हणजे टोळींतील वयांत आलेल्या सर्व पुरुषांचा सर्व स्त्रियांशी समाईक व्यवहार असे, असें सांगितल्यावर (पान २६) "विद्यमान नैतिक कल्पनेप्रमाणें त्या वेळच्या व्यवहारास स्वैराचार हें नांव ठेवणें योग्य होणार नाही. फार झाल्यास त्याला स्वैरविहार असें नांव देतां येईल," असें सांगण्याची काय जरूर आहे? आणि स्वैरविहार हा शब्द वापरल्याने काय साधलें? विहार याचा अर्थ 'क्रीडा' असा आहे. ती स्वैर असलेली चालते आणि आचार मात्र स्वैर असतां नये? स्वैराचार मात्र पाप आणि स्वैरविहार पाप नव्हे? एकंदरींत त्या वेळची पद्धत अनैतिक होती असा विचार लेखकाच्याच मनांत आला, त्याचा हा परिणाम आहे. असो. त्याच्याच पुढच्या पानावर ही पद्धत कशी नष्ट झाली याचें कारण सांगितलें आहे, तें मात्र अजब आहे, आणि निःसंशय चूक आहे. "ती नष्ट होण्याचें बलवत्तर कारण असें आहे की इतर प्राण्यांस लागू न होणारा एक जीवनक्रियेचा नियम मनुष्य-प्राण्यास लागूं होतो. तो म्हणजे सपिंड शरीरसंबंधांचा घातुकपणा हा होय... आईबाप व त्यांचीं मुलें, अगर भाऊ व बहिण, अशांच्या शरीरसंबंधापासून झालेली संतति ही कमकुवत व अल्पायुषी होते. हा निकट रक्तसंबंध मनुष्य प्राण्याच्या संबंधाने जितका घातुक होतो, तितका दुसऱ्या कोणत्याही उत्क्रांतींतील खालच्या श्रेणींतील प्राण्यांत होत नाही." निसर्गाने मनुष्यप्राण्याकरतां कांही वेगळे नियम केले आहेत, हा शोध अजब आहे खरा! बहुधा मनुष्यानें नीतीने रहावें म्हणूनच हा नियम केला असावा! या विधानाने शास्त्रीय दृष्टीवर पाणी पडलें आहे. याशिवाय एकंदर पुस्तकांत पारंपरिक दृष्टि व्यक्त होते ती अशी. विवाहाची एकेरी पद्धत, म्हणजे एकपति व एकपत्नी ही पद्धत, उच्च दर्जाची असें गृहीत धरून हें सर्व पुस्तक लिहिलें आहे, इतकेंच नव्हे तर पान ५३ वर यूरोपीयांसंबंधी असें म्हटलेलें आहे की "तिकडील समाजाने बहुपत्नीक कुटुंबपद्धति नष्ट करून एकपति–एकपत्नी या वरच्या पायरीस ती नेली." केवळ समान हक्कांच्या–नव्हे, समान निर्बंधांच्या–दृष्टीने पाहिजे तर या प्रकाराला

वरची पायरी म्हणावें, परंतु लेखकाची केवळ अशी दृष्टि नाही. समागमवैचित्र्यांत कांही कमीपणा आहे अशी त्यांची ठाम समजूत दिसते. समान निर्बंधांपेक्षा समान स्वातंत्र्य बरें असें आमचें मत आहे. लेखकाने एकदा ज्याला ' स्वैरविहार ' म्हणून क्षम्य मानलें, त्यालाच नंतर स्वैराचार म्हणून निंद्य मानावें याचा अर्थ काय ? समागम एकाच व्यक्तीशीं करण्याने काय पुण्य लागतें तें आम्हास समजत नाही. याला लेखकाने ' शुद्ध ' हा शब्द लावला आहे. " संपूर्ण समानतेची अमदानी रूढ झाल्यावर...पुरुषांचा **बेइमानपणा** स्त्रिया एक क्षणभर सहन करणार नाहीत. अशा प्रकारें **वर्गवर्चस्व** नष्ट झाल्यानंतर सनातनी म्हणतात त्याप्रमाणे स्वैराचारास उत्तेजन न मिळतां पुरुषांच्या **नाकांत वेसण** अडकविली जाऊन त्यांचें वर्तन जास्त **शुद्ध** होईल " ( पान ८५, जाड टाइप मूळांत ). अशा वर्तनांत शुद्धता काय आहे हें समजत नाही, आणि नाकांत वेसण अडकवल्याने येणाऱ्या शुद्धतेची नैतिक किंमत काय असणार ? शिवाय अनेकांशीं समागम केल्याने जर अशुद्धता येत असेल तर एक पति किंवा पत्नी मेल्यावर मग तरी पुनः लग्न केल्यानें शुद्धता कशी बिघडत नाही ? समागम प्रेमावर अधिष्ठित असावा या म्हणण्यांत कांही तरी अर्थ आहे. पण एकदां एका मनुष्यावर प्रेम बसलें की तें कायम टिकतें असें म्हणण्यास काय आधार आहे ? समजा, प्रेम टिकलें नाही, तर तेवढ्याच कारणाने घटस्फोट करणें लेखकास मान्य आहे काय ? असें झाल्यास मुलांचें नुकसान नाही काय ? आमचे मतें एवढें कारण पुरेसें नाही. वैचित्र्याची जरूरी पुरुषांपुरती कबूल करून स्त्रियांस मात्र नको म्हणणें ही सनातनी हिंदू वृत्ति आहे. वैचित्र्य दोघांसही नको म्हणणें आणि तें ' अशुद्ध ' मानणें ही ख्रिस्ती वृत्ति आहे. दोहोंतही समंजसपणा नाही. पहिल्या वृत्तींत निदान स्वार्थ तरी आहे, दुसरींत केवळ मूर्खपणाच आहे.

२. ' नवयुग विद्यार्थीधर्म ' हें पुस्तक अनधिकारी लेखकाने लिहिलेलें आहे असें म्हटल्याशिवाय राहवत नाही. अशा प्रकारच्या प्रत्यक्ष उपदेशाचा बिलकुल परिणाम होत नाही, हें समजण्यास मानसशास्त्रज्ञच लागतो असें नाही. सर्व चांगले गुण मिळवावे, वाईट गुण टाकावे, अभ्यास करावा, उनाडूं नये, वगैरे गोष्टी विद्यार्थ्यांना

कळत नाहीत अशी दिवेकरशास्त्र्यांची कल्पना दिसते. विद्यार्थ्यांस उपदेश कर यचाच असेल तर तो अप्रत्यक्ष रीतीने, गोष्टींच्या रूपाने करावा लागतो, आणि अतिशय जपून करावा लागतो. नाहीतर एकीकडे सत्याची महति सांगावी, आणि क्लाइव्हच्या दुटप्पी वर्तनामुळे इंग्लंडचा कसा फायदा झाला हेंही शिकवावें. धर्मा उदाहरण आदर्श म्हणून लेखकाने दिलें आहे पण त्याने द्यूतांत बायकोला पणाल लावून ती गमावली आणि सर्व कुटुंबावर संकट आणलें हें सर्वांना माहीतच आहे रामराज्याची स्तुति करावी, आणि त्याने निरपराधी शूद्राचें डोकें उडवलें आणि लपून बाण मारून वालीचा वध केला असेंही विद्यार्थी वाचतात. अशा उपदेशाचा का उपयोग ? असल्या उपदेशाला आम्ही विद्यार्थी असतांनाच हंसत होतों, तसेच आतां विद्यार्थीही हंसतील. या पुस्तकांतून कांही ज्ञान मिळेल म्हणावें तर ठिकठिकाणीं अज्ञा सांपडतें. या पुस्तकांत खोटीं व हास्यास्पद अशीं शेंपन्नास विधानें काढून देण्या मुळींच अडचण पडणार नाही. इकडेतिकडे ऐकलेल्या गप्पा एकत्र करून पुस्तक लिहिलेलें आहे, त्यांत शास्त्रीय ज्ञान नाही. 'अलीकडे माणसें दांत स्वच्छ ठेवीत नाहीत म्हणून अलीकडे पायोरियाचा रोग फार वाढत आहे' (३७) दातांची अत्यंत काळजी घेणारांना देखील पायोरिया होतो व त्याचीं कारणें वेगळ असतात हें लेखकाला माहीत नाही. पहाटे उठून अभ्यास करण्याचा ते उपदे करतात, परंतु आमचा स्वतःचा अनुभव आहे की लहानपणीं आम्हास पहा उठवणारे एक गृहस्थ भेटले होते, परंतु त्यांनी अभ्यासाला बसवल्यावर, पाठी रट्टे बसण्याची भीति असतांना देखील आम्हास डुलकी येत असे आणि अतिश त्रास होत असे. आम्ही परीक्षेचे वेळीं अभ्यास रात्रीं जागूनच केला. ( अर्था प्रकृतीच मानानें जमेल तितकें जागून ) व आमचा अभ्यास साधारण बरा झाल असावा असें वाटतें, कारण मॅट्रिकला ४३०० मुलांत आमचा नंबर पहिला आल होता. पहाटे उठण्यासंबंधी अनेकांस असाच अनुभव येतो. अर्थात् ज्यांस या उलट अनुभव येईल त्यांनी पहाटे अभ्यास करावा, पण दिवेकरांनी सांगित ल्याप्रमाणे ईशस्तवनांत वेळ फुकट न घालवतां, तोच वेळ झोपेंत किंवा अभ्या सांत घालवल्यास जास्त उपयोग होईल. ईश्वर देखील जर स्तुतीला भुलण्याइतक

बावळट असला, तर मनुष्यांत आणि ईश्वरांत फरक काय ? पण दिवेकरांनी लहानपणीं वाचलें होतें की 'स्तुती करावी परमेश्वराची' आणि तेंच ते इतरांना सांगतात. स्वतःचा विचार नाही, किंवा असें लिहिल्याने जनता खुष होते, म्हणून हा उपदेश. मासिकांचा खप व्हावा म्हणून त्यांवर स्त्रियांचीं चित्रें घालतात असें दिवेकर म्हणतात; आणि स्वतःचें पुस्तक खपावें म्हणून परमेश्वर, सूर्यनमस्कार, औंधचे व मिरजचे राजेसाहेब, इत्यादिकांची स्तुति करतात. यांपैकीं त्यांचा मार्ग विशेष उच्च दर्जाचा आहे असें वाटत नाहीं. या विषयाचा अभ्यास केल्याचें यत्किंचितही चिन्ह या पुस्तकांत दिसत नाही. पान ६० वर ते लिहितात "पण गाईचें दूध उत्तम, म्हशींचें मध्यम आणि शेळीचें कनिष्ठ समजावें." कां ? दिवेकर सांगतात म्हणून. महात्माजी देखील स्वतःला यांत तज्ञ समजतात आणि ते स्वतः शेळीचे दूध पसंत करतात तें कां ? शेळीच्या दुधाची दिवेकरांस माहिती नाही. ते पांच प्रकार, म्हणजे मद्य, मांस, मदन, मोह आणि मस्ती, वर्ज्य करायला सांगतात आणि तेच त्याच पानावर म्हणतात, "हिंदु समाजांतील ज्या जाती प्रवृत्तमांस आहेत त्यांनी निवृत्तमांस व्हावें असें नाहीं." एकंदरींत जनतेला खुष करण्याचाच दिवेकरांचा उद्देश दिसतो. मांसाहार वाईट असें त्यांचें मत असेल तर तें स्पष्ट लिहिण्याचा कां धीर होत नाही ? अशा पुस्तकाबद्दल विशेष जास्त लिहिण्याचें कारण नाहीं, तथापि एकदोन गोष्टी सांगणें जरूर आहे. दिवेकरांचे मतें विद्यार्थीदशा पंचवीसतीस वयापर्यंत असते आणि तेथपर्यंत ब्रह्मचर्य पाळलें पाहिजे असा पुरातन उपदेश ते साहजिकच करतात व त्याला जोर देण्याकरतां हनुमान, भीष्म, रामदास वगैरे ठरीव उदाहरणें देतात. पुराणांतल्या गोष्टी खऱ्याच मानायच्या असतील तर श्रीकृष्णाच्या सोळाहजारांवर बायका आणि गोपींच्या गोष्टीही पुराणांतच आहेत, आणि त्याचा पराक्रम भीष्मापेक्षां कमी होता असें कोठेही सांगितलेलें नाही. तसेंच रामदास स्वामी ब्रह्मचारी होते असें धरून चाललें तरी त्यांनी शिवाजीपेक्षा जास्त पराक्रम केल्याचें ऐकिवांत नाहीं. ब्रह्मचर्याविषयी आधुनिक मत दिवेकरशास्त्र्यांस आम्हीं स्वतः सांगितलेलें आठवतें, परंतु त्यांना पुराणें अधिक पसंत असलीं तरी

त्यांतूनही त्यांचें मत सिद्ध होत नाही. एकंदरींत या पुस्तकांत गप्पाच फार, उपयुक्त भाग फारच थोडा. ते ५० पानावर म्हणतात, " सर्व विद्यार्थ्यांमध्यें विषय आकलन करण्याचें साधारणपणें सामर्थ्य सारखेंच. " असलीं ' गांधी छाप ' विधानें करणाराच्या स्वतःच्या आकलनशक्तीबद्दल जबरदस्त शंका येते. दिवेकरांचें म्हणणें मान्य केल्यास ' वितरति गुरुः प्राज्ञे विद्यां यथैव तथा जडे' यांतील ' जड ' या शब्दाचा कांही अर्थच होणार नाही, कारण ज्याला आकलनशक्ति कमी असते त्यालाच जड म्हणतात, आणि असे विद्यार्थी नसतात हें विधान कोणत्याही शिक्षकाला पटणार नाही. दिवेकरही एकदां शिक्षक होते असें म्हणतात आणि म्हणूनच त्यांच्या स्वतःच्या आकलनशक्तीबद्दल आम्हांस शंका येते. इतकी साधी गोष्ट ज्यांना कळत नाही त्यांचीं पुस्तकें वाचण्यापासून काय फायदा? **सं.**

२ ग्वाल्हेर, २३.९.३७.

स्वास्थ्याच्या सप्टेंबरच्या अंकांत आलेलें श्री. शकुंतलाबाईंचें श्री. शारदाबाईंस पत्र व त्यांचें उत्तर वाचून खालील विचार सुचले, ते आपणापुढें मांडीत आहें. श्री. शकुंतलाबाई विद्वान आहेत, पण त्यांनी मानवी जीवनाचा व संस्कृतीचा फारसा अभ्यास केल्याचें दिसत नाही. त्यांचा सिद्धांत असा की मुलांवर आईचें प्रेम नैसर्गिक असतें, बापाचें मुलांवरील प्रेम नैसर्गिक नसतें, पण तें एका प्रकारच्या विश्वासावर व सहवासावर अवलंबतें. ज्याला आपण नैसर्गिक म्हणतों, त्याचा अर्थ कधीं न बदलणारें असाच अभिप्रेत असतो. ता. १७.५.३७ च्या ' हिंदुस्थान टाईम्स ' मध्यें प्रो. बी. आर. आगरवाला यांचा ' मुलें, त्यांचें भूत, वर्तमान आणि भविष्य ' या मथळ्याखालीं एक लेख प्रसिद्ध झाला आहे. त्यांत ऐतिहासिक कालापासून मानवी वंशाच्या निरनिराळ्या शाखांकडून मुलांना कसकसें वागवण्यांत आलें व पुढें कसें वागण्यांत येईल, याचें संक्षिप्त दिग्दर्शन केलें आहे. त्यांतील कांही भाग असाः—" न्यू गायना मध्यें कांही लोकांत मुलांना मारून खाण्याची चाल होती. तसेंच आस्ट्रेलियांतील कांहीं मानवी वंशांत अशी चाल होती कीं आईने आपलें पहिलें मूल मारून खावयाचें. असें केल्याने पुढील बाळंतपणें

सहन करण्याची शक्ति येते असा समज. सन १७८३ च्या दुष्काळांत जपानांत आईबापांनी आपलें मुलें मारून खाल्ल्याचे दाखले आहेत. धर्माच्या नावांखालीं तर हिंदुस्थानांत सुद्धां अलीकडेपर्यंत मुलांना बळी देण्याची चाल होती. आफ्रिकेंतील रानटी लोकांत दांत आलेलें मूल जन्मलें की त्याला मारून टाकण्याची चाल आहे. कांही लोकांत पायाळू मुलें ठार मारतात, तर कांही लढाऊ लोकांत मुलगी झाली कीं मारून टाकतात. सन १६५९ मध्यें चिनांत मुलींना बूडवून टाकण्याच्या रीतीला आळा घालण्याकरतां कायदा करावा लागला होता. मुलें विकण्याची चाल रोमन लोकांत होती. १६ व्या व १७ व्या शतकांत युरोपांत रस्त्याच्या डाव्या उजव्या बाजूंना टाकेलली मुलें सांपडत व अद्यापिही सर्वत्र मिळतात." या सर्व इतिहासाचा विचार करतां मुलांवरील आयांचें प्रेम कांही श्री. शकुंतलाबाई म्हणतात तसें नैसर्गिक दिसत नाही. मुलें मेलीं असतां दुःखातिशयानें आयांनी आत्महत्या केल्याचीं उदाहरणें आहेत. इतकी माणसानें मातृप्रेमाची उन्नति केली आहे हें खरें. पण तें कांहीं नैसर्गिक नव्हे, हे माणसाच्या संस्कृतीचें फळ आहे. माणसाला एखाद्या गोष्टीची सवई करायला काय वेळ लागेल तेवढेंच. एकदा सवई झाली की ती नैसर्गिक आहे असेंच वाटतें व सवई वाटेल त्या चांगल्या अथवा वाईट जडवून घेतां येतात. मातृप्रेमाची जशी उन्नति झाली आहे, तशीच पितृप्रेमाची झालेली आहे. लग्नाच्या बायकोला झालेलें मूल आपलेंच आहे असा बापांचा विश्वास असतो हें खरें असलें, तरी कोणत्याही मुलाची आई कोणती हें जसें खात्री-लायक सिद्ध करतां येतें, तसें त्याचा बाप कोण हें शाबीत करणें कठिण आहे, इतकेंही समंजस पुरुषांना ठाऊक नसतें असें म्हणणें धाडसाचें आहे, व हा विश्वासच पितृप्रेमाला आधारभूत आहे असें सर्वस्वी मानण्याचें कारण नाही. बापाच्या प्रेमासंबंधीं श्री. शकुंतलाबाईचे उद्गार फारच अनुदार आहेत. त्याला त्यांच्याजवळचीं उदाहरणें कारणीभूत असतील, पण त्यांच्या विद्वत्तेला हें एकतर्फी भावनाप्रधान मत विशोभित दिसतें. त्या म्हणातात, प्रेमळ म्हणवणाऱ्या अनेक बापांनी मूल आपल्या आज्ञेच्या किंवा ध्येयाच्या बाहेर वर्तन करूं लागलें असतां त्याला घरांतून बाहेर घालवल्याचीं, किंवा ' यापेक्षा तूं मेला

असतास तर बरें झालें असतें' असें म्हटल्याचीं अनेक उदाहरणें आहेत. आणखी त्यांनीं असें विचारलें आहे की आयांच्या हातून हें होणें शक्य आहे का, व अगदीं जवळचें म्हणून त्यांनी स्वतःच्या वडलांचें उदाहरण दिलें आहे. थोड्या दिवसांपूर्वी लाहोर हायकोर्टाच्या हद्दींत एका ब्राम्हण विधवेने आपल्या हरिजन प्रियकराकडून आपल्या १०–१२ वर्षांच्या मुलाला ठार मारवून त्याचे तुकडे स्वयंपाकघरांतच पुरून ठेवल्याचें उघडकीस आल्याचें हिंदुस्थान टाइम्स मध्ये प्रसिद्ध झालें आहे. हा मुलगा शाळेंत जाणारा होता आणि त्याला आपल्या आईच्या प्रेमलीला आवडत नसत. या उदाहरणावरून सर्व आया नीच असतील असें का मानायचें ? पुरुषांची निंदा करण्याच्या भरांत श्री. शंकुतलाबाईंना स्त्रीस्वभावाची दुसरी बाजू दिसली नाही यांत नवल नाही. ज्या मातृप्रधान कुटुंबपद्धतीचा अवलंब करण्यास श्री. शकुंतलाबाई उत्सुक आहेत त्यांत अशा गोष्टी घडणार नाहीत अशी हमी कोण घेणार ? तरी बरें की मातृप्रधान कुटुंबपद्धतीचा अवलंब कां करूं नये, असें त्यांनीं शारदाबाईस तरी विचारलें. श्री. शारदाबाईचे लेख जरी क्रांतिकारक असले तरी त्यांत समतोलवृत्ति व समंजसपणा ओतप्रोत भरलेला असतो. भावनेच्या भराऱ्या मारणारांना त्या वास्तवतेच्या दृढमूल वृक्षावर थोडीतरी विश्रांति घ्यावयास लावतात. याचें प्रत्यंतर त्यांच्या श्री. शकुंतलाबाईस लिहिलेल्या उत्तरांतही सांपडतें. शेवटीं श्री. शकुंतलाबाईंना समतोल विचारसरणीची लागवड त्यांचे सुसंस्कृत हृदयांत करायची विनंति करून आपली रजा घेतों. आपला शं. बा. देशपांडे.

**शकुंतलाबाईंचें उत्तर.** श्री. देशपांडे यांचें पत्र मजकडे पाठवल्याबद्दल मी आपली आभारी आहें. मानवी जीवनाचा व संस्कृतीचा आपण स्वतः बराच अभ्यास केला आहे अशी श्री. देशपांडे यांची समजूत आहेसें दिसतें, तसेंच तर्कशुद्ध विचार करण्यांत आणि मांडण्यांतही आपण फार कुशल आहोंत अशीही कदाचित् त्यांची समजूत असेल. श्री. देशपांडे म्हणतात ' ज्याला आपण नैसर्गिक म्हणतों त्याचा अर्थ कधीं न बदलणारें असाच अभिप्रेत असतो. ' परंतु

सर्वच नैसर्गिक गोष्टी कांहीं न बदलणाऱ्या नसतात. उदाहरणार्थ एखादें फूल घ्या. तें नैसर्गिक असतें, परंतु तें क्षणाक्षणाला बदलत असतें. दुष्काळांत आईने मुलें मारून खाल्लीं असलीं, तरी त्यावरून आईचें मुलांवरील प्रेम नैसर्गिक नसतें असें सिद्ध होत नाही. तिचें स्वतःवरील प्रेम अधिक असतें इतकेंच सिद्ध होतें. धार्मिक समजुतीपायीं होत असणारे अत्याचार नैसर्गिक नव्हत. श्री. देशपांडे म्हणतात, ' इतकी माणसांनीं मातृप्रेमाची उन्नति केली आहे, पण तें कांही नैसर्गिक नव्हे.' पण मी म्हणतें की मातृप्रेम नैसर्गिक रीत्या अस्तित्वांत असल्याखेरीज माणूस त्याची उन्नति कशी करील ? श्री. देशपांडे म्हणतात की मुलाचा बाप कोण हें शाबीत करणें कठिण आहे इतकेंही समंजस पुरुषांना ठाऊक नसतें असें म्हणणें धाडसाचें आहे. असें कोणी म्हटलें असेल तें श्री. देशपांडेच जाणोत, मी तसें म्हटलेलें नाहीं. बापाच्या प्रेमाविषयीं माझे उद्गार अनुदार आहेत, वाजवी आहेत, किंवा उदार आहेत. हें ज्याचें तो ठरवील. पण " आयांच्या हातून हें होणें शक्य आहे का ? " हें वाक्य मात्र माझें नव्हे. " किती आयांच्या हातून हें होणें शक्य आहे ? " असें मी म्हटलें आहे. अशा आया अशा बापांच्या मानानें फारच कमी निघतील, एवढेंच मी प्रतिपादन करतें. मी पुरुषांची निंदा केली आहे असा श्री. देशपांड्यांचा मजवर आरोप आहे. चर्चेला टीका केव्हां म्हणावें, आणि टीकेला निंदा या सदरांत केव्हा ढकलावें, हेंही ज्याचें तो ठरवील, परंतु श्री. देशपांड्यांनी पदरचीं वाक्यें घुसडून दिल्यास किंवा माझीं वाक्यें विद्रूप केल्यास त्यांबद्दल मात्र मी जबाबदार नाहीं. मातृवंशी कुटुंबपद्धति पुढेंमागें प्रचारांत आली तरी बापाला मुलावर, किंवा मुलाच्या आईवरही, प्रेम करूं नको असें कोणी म्हणणार नाही. जातां जातां श्री. देशपांड्यांनी चि. शारदेची पाठ थोपटली आहे त्यांत मला आनंदच आहे. तिच्या पत्राचें उत्तर मी सवडीनुसार देईन.

आपली **शकुंतला परांजपे.**

---

# शारदेचें पत्र

भास्करराव जाधवांच्या रामायणावरच्या व्याख्यानानें ' पुणें येथील सुप्रसिद्ध भाषाध्यापक श्री. गो. कृ. मोडक ' खूपच चिडलेले दिसतात. मोडकांच्या मताला किती किंमत द्यावी हा एक प्रश्नच आहे, कारण त्यांच्या मतानें सीता अजून जिवंत आहे. रावणानें तिजवर अत्याचार केला होता असें जाधवराव सुचवतात, असें म्हटल्यावर ते पुढे लिहितात, "शिव, शिव ! सीतेविषयी खंडनाच्या इच्छेने कां होईना, अशी भाषा मला वापरावी लागत आहे, हें माझें दुर्दैव होय. ही गोष्ट निरुपायानेच मी करीत आहें हें लक्ष्यांत आणून सीतामातेनें मजवर कोपूं नये अशी माझी नम्र प्रार्थना आहे." त्यांनी सांगून ठेवलें म्हणून बरें, नाहींतर सीतामाई काय विचारता ? बावळटच ती ! तिला एवढें समजायची अक्कल कोठे आहे ? ती एकदम कोपायची ! पण मोडकांना म्हणावें संभाळून रहा. सीतेला तुम्हीं सांगितलेंत, पण रामाची काय वाट ? ती आर्यस्त्री असल्यामुळें नवऱ्याजवळ बोलायला लाजेल, आणि तो शंबूकाचें डोकें उडवणारा प्रख्यात न्यायनिष्ठुर रामचंद्र हे शब्द लिहिल्याबद्दल मोडकांचें डोकें उडविल्याशिवाय राहाणार नाहीं. हो, सीता जिवंत असली तर रामानेच काय पाप केलें आहे ? सीतेला प्रजेनें नांवें ठेवल्यावरून एकदां त्याने सीतेलाच घालवून दिली खरी, पण तेव्हां तो राजा असल्यामुळे प्रजेचे ऐकणें त्याला भाग होतें. पण आतां नाही तें चालायचें, हां ! मोडकांनी हे शब्द खंडणाकारतां लिहिले आहेत हें तो पाहणार नाहीं. एकदम शिरच्छेद ! आणि त्या महापवित्र सीतेची मोडकांनी काय किंमत ठेवली आहे ? ते म्हणतात की तिला जेव्हा वनांत सोडून द्यायला रामाने लक्ष्मणाला सांगितलें, तेव्हा ती लक्ष्मणाला म्हणते ' माझ्या देहाकडे नीट पहा, म्हणजे तुझ्या लक्षांत येईल की मी गरोदर आहें ' सीतेच्या पायांतल्या नूपुराच्या वर ज्याची दृष्टि कधींही फिरकली नाही, त्या बिचाऱ्या लक्ष्मणाला सीतेने देह न्याहाळून पहायला सांगितल्यावर त्याची काय त्रेधा झाली असेल

त्याची कल्पनाच करावी ! पतिव्रतांनी परपुरुषाकडे पहावयाचें देखील नसतें म्हणे ! आणि मग परपुरुषांनीं त्यांच्या देहाकडे पाहिलेलें चालतें वाटतें ?

मी म्हणतें ज्या रामायणांत दशमुखी रावण देखील सांपडतो, त्यांत थोड्या-बहुत थापा असायच्याच. त्यांत खरें आणि खोटें ठरवायचें कसें ? ' अरेबिअन नाइटस् ' पेक्षा त्याची किंमत जास्त मानण्याचें कारण नाही, ' अरेबिअन नाइट्स् ' मधें खलीफ हरून अलरशीद हा ऐतिहासिक पुरुष तरी होता, पण रामायणा-बद्दल मुळी ही हिंदुस्थानांतली गोष्ट आहे की इजिप्तमधली, येथूनच शंका ! सीता ही हिंदु स्त्री होती की नाही हेंच जर निश्चित नाहीं, तर ती आदर्श हिंदु स्त्री होती की नाही हा प्रश्न जरा लांबचाच नाही का ? मग रावणाने तिच्यावर अत्या-चार केला की नाही याचा ऊहापोह कशाला ? आतां रावण दशमुखी होता यावरून तो खोटाच, असें सनातनी लोक कबूल करणार नाहींत. त्याचा अर्थ कदाचित् लाक्षणिकही असेल. ज्यानें देवांना देखील जिंकलें, तो त्यांच्यापेक्षा डोक्याने, म्हणजे अकलेने, दसपट श्रेष्ठ म्हणून कदाचित् त्याला दहा डोकीं आहेत असें कोणीं म्हटलें असेल. पण तें असो, माझें म्हणणें एवढेंच की रामायणाचा कीस काढून कदाचित् वाल्मीकीच्या मनांत काय म्हणायचें होतें हें कळेल, पण तसें खरेंच होतें की काय हें कळणार नाहीं.

' यशवंत ' मासिकाने गचाळ लेख छापायचा जणूं काय मक्ताच घेतला आहे. त्यांत डॉ. मनोरमाबाई थत्ते यांनी संततिनियमनाविरुद्ध लेखमाला लिहिण्याची धमकी दिली आहे. त्यांनी आधार म्हणून ज्यांचीं नांवें दिलीं आहेत त्यांत रसेल पतिपत्नींचेंही नांव दडपलें आहे. तेव्हा त्यांचा धूळफेक करण्याचाच विचार दिसतो, कारण हीं दोन माणसें तरी निदान संततिनियमनाविरुद्ध नाहींत हें सग-ळ्या जगाला माहीत आहे. आणि काय या डाक्तरीणबाईची घमेंड ? स्त्रियांसंबं-धीची कळकळ जणूं काय फक्त यांनाच. त्यांनीं कांहीं डाक्तरांचीं नांवें विरुद्ध दाखवलीं तर त्यांच्या पेक्षा प्रसिद्ध डाक्तरांचीं नांवें उलट बाजूला दाखवतां येतील. त्या आपल्या पतीच्या आणि सवतीच्या मदतीने एक सूतिकागृह सांगलीला

चालवतात, त्याला कदाचित् ही जाहिरात चांगली होईल, पण मी त्यांना आधीच बजावतें की स्वतःची फजीति करून घेण्याचा हा मार्ग त्यांना सुचला आहे. डॉक्टर संततिनियमनाविरुद्ध पुष्कळ वेळां कां असतात, याचें कारण डॉ. रॉबिनसन-सारख्यानें असें दिलें आहे की तें त्यांना धंद्याच्या दृष्टीने नडतें. मनोरमाबाई अत्यंत प्रामाणिक असल्यामुळें त्यांच्या मनांतही असा स्वार्थी विचार कधी येणार नाही हें खरें, पण लोकांना काय ? तें असें म्हणायला मुळीच कमी करणार नाहीत. तेव्हा त्यांना एक विनंति आहे की त्यांनीं मेहेरबानी करून फालतू डाक्त-रांचीं नांवें सांगण्याऐवजी स्वतःच्या अकलेने जे काय मुद्दे सुचतील ते मांडावे. तरीदेखील त्यांची फजीति ठरलेलीच, पण निदान त्यांनी स्वतः विचार केल्यासारखें तरी दिसेल. एरवी ती पोपटपंचीच वाटेल.

‘ साहित्याचें महत्वमापन ’ म्हणून त्यांत एक सदर आहे, आणि लेखक ‘ विष्णुशर्मा ’ आहे. त्यांत गेल्या अंकांत मामा वरेरकरांच्या ‘ समोरासमोर ’ नाटकावर टीका आली आहे. ‘ विष्णुशर्मा ’ हा कोण ठोंब्या आहे हें मला माहीत नाही, पण लिखाणावरून पाहिलें तर तो एखादा शाळेंत जाणारा मुलगा असावा. त्या बिचाऱ्याला भांडवल म्हणजे काय हें देखील माहीत नाही. अंजलीने एक लाख रुपये भांडवलाची ‘ लिमिटेड् कंपनी ’ केली, याचा अर्थ तो करतो की तिने शिवणकामावर थोडक्याच वेळांत एक लाख रुपये मिळवले. भांडवल आणि नफा यांत असा घोटाळा शाळेंतल्या दगड मुलाशिवाय कोण करील ? लिमिटेड कंप-नींत एकाच मनुष्याने मिळवलेला फायदा भांडवल म्हणून घातला पाहिजे असाही कायदा नाही, आणि एकाच मनुष्याच्या भांडवलावर लिमिटेड कंपनी काढतांही येत नाही. इतकी ज्यांची अक्कल, ते वरेरकरांसारख्यांच्या नाटकांवर टीका लिहि-ण्याचें धाडस कां करतात ? प्रसिद्धीकरतां म्हणावें, तर नांवही खरें दिसत नाही. यावर पैसे मिळत असतील म्हणावें, तर तेंही शक्य दिसत नाही. नायकाने स्वदेशी मोटर तयार करणें या शहाण्यांना अशक्य वाटतें. तरी बरें, नुकतीच एक स्वदेशी मोटर कोणींतरी जवाहिरलाल नेहरूंना बक्षिस दिली आहे. तेव्हा ही शक्य

गोष्ट आहे हें झालेंच, आणि ही मोटर केलेली नसती तरीदेखील ती शक्य मानायला कांहीच अडचण नव्हती. जें शक्य आहे तें वरेरकरांच्या नायकानेच कां करूं नये ? पण हे शहाणे म्हणतात 'नाटककाराला कल्पनाशक्तीचा विलास करणें आवश्यक असतें हें कोणीही कबूल करील, पण कल्पनाशक्तीचा विलास म्हणजे अफूची गोळी खाऊन शेखमहंमदी मनोराज्य करणें नव्हे'. यावरून लेखकानेच अफूची गोळी खाऊन त्या धुंदीत हा लेख लिहिला की काय अशी शंका येते. हें स्वतःच्या कल्पनाशक्तीच्या दारिद्र्याचें प्रदर्शन आहे. दुसऱ्याने मांडलेल्या कल्पनेपर्यंत देखील यांची कल्पनाशक्ति पोंचूं नये हें आश्चर्य आहे. या नाटकांत नाटककाराला काय सांगायचें आहे, हेंही या मुलाला कळलेलें नाहीं. नाटकांत दोन जोडपीं तर अशीं दाखवलीं आहेत कीं त्यांत शेवटीं पतिपत्नी 'समोरासमोर' आपले वेगवेगळे धंदे थाटतात. तिसऱ्या जोडप्यांतला नवरा घटस्फोट मिळवतो, पण जगण्याचा कांही मार्ग न सांपडल्यामुळें पुनः त्याच बायकोशी लग्न करून तिच्या आश्रयाला येतो. यावरून हा मुलगा तत्व काय काढतो, की " स्वतंत्र होण्यासाठी नोकरी अगर धंदा करणाऱ्या स्त्रियांना खरें स्वातंत्र्य मिळत नाही... इतकेंच नव्हे तर पांढरपेशा स्त्रीवर्गास 'लग्न करून सुखाने संसार करण्यांतच त्यांचें हित आहे' असा अस्पष्ट संदेश पांढरपेशा स्त्रीवर्गाला नाटककाराने दिला आहे असें वाटूं लागतें." हा संदेश यांच्या अफूबाज डोक्यांतून निघाला असला पाहिजे, नाटकांतून निघत नाहीं. नवऱ्याला स्वतंत्र धंदा करावयाची अक्कल नसेल तर त्याने घटस्फोट मिळविण्याच्या भानगडींत पडूं नये, असा संदेश त्यांतून निघेल कदाचित. या बाललेखकाने शेवटीं वरेरकरांसारख्या कसलेल्या लेखकाला उपदेश करण्याचा आव आणला आहे. तशी आपली लायकी नाही, हें कदाचित् तो मोठा झाल्यावर त्याला कळेल. नाटकाची गोष्ट संक्षेपाने देतांना त्याने म्हटलें आहे की " चवथ्या अंकाच्या शेवटीं मोटार कारखान्यांतील हा मजूर एक संपूर्ण स्वदेशी मोटार तयार करून जगदीश बोस, पी. सी. राय, सी. व्ही. रमण, यांच्यापेक्षा उपयुक्त असा शोध लावतो ". हें या मुलाचें स्वतःचें मत आहे की उपरोधिक लिहिण्याचा प्रयत्न आहे हें सांगणें कठीण आहे, पण कांही असलें तरी मूर्खपणा

आहे हें खरें. नाटकांत अशा प्रकारचें एक वाक्य आहे खरें, पण तें मुलाच्या पराक्रमानें फुललेल्या सनातनी बापाचें वाक्य आहे, नाटककाराचें मत म्हणून दिलेलें नाही. या वाक्यांतला विनोद ज्याला कळत नाही तोच यावर उपरोधिक लिहूं शकेल. ' यशवंत ' मासिकाला जाणते लेखक मिळतच नाहीत काय ?

किनरे मास्तरांनी आपले अचरट लेख पुनः सुरू केले आहेत असें दिसतें, पण आतां पत्र फार लांबलें. पुढच्या वेळीं लिहीन.

तुझी **शारदा**.

---

# एक सामाजिक गुन्हा

( बर्टी आल्ब्रेष्ट यांचे फ्रेंचवरून )

१९२६ सालीं ' चार्लस् मिलर ' नांवाच्या एका अमेरिकन् मनुष्यानें आपल्या मृत्युपत्रांत ५ लक्ष डॉलरचें एक बक्षिस ठेवलें. तें असें की पुढील दहा वर्षांत ' टोरोंटो ' येथील ज्या स्त्रीला सर्वांत जास्त मुलें होतील तिला तें बक्षिस मिळायचें. ही दहा वर्षे अर्थातच अजून संपली नाहीत, पण तें बक्षिस कॅनडामधील एका फ्रेंच बाईला मिळणार हें ठरल्यासारखेंच आहे. ( हा लेख १९३५ मधला आहे. **संपादक** ) कारण तिला गेल्या ९ वर्षांत १४ मुलें झालीं ( तीन वेळां जुळीं झालीं ). या १४ पैकी ९ मुलें मेलीं हा भाग वेगळा, पण त्यांपैकी एक मूल उंदरानें मारलें. हा सामाजिक गुन्हा नव्हे काय ?

या १४ मुलांकरता तिची ११ बाळंतपणें झालीं. म्हणजे ९ वर्षांतील १०८ महिन्यांपैकी तिचे ९९ महिने गरोदरपणांत गेले. म्हणजे सरासरी मानाने बाळंतपणानंतर तीन आठवड्यांनी तिला पुनः गर्भ रहात असे. आफ्रिकेंतलि रानटी लोक देखील अशा तऱ्हेने वागत नसतील. बरें ज्याकरता ५ लाख डॉलर बक्षिस मिळणार, अशा या पराक्रमाचे परिणाम काय ? तर या १४ मुलां-

पैकी ९ मुलें मेलीं, यामुळे शक्य त्या उपायांनीं लोकसंख्या वाढवूं पहाणाऱ्या लोकांचे दृष्टीनेही मोठासा फायदा झाला नाही. शिवाय गरिबींत रहाणारी आणि नेहमीच गरोदर असणारी बाई मुलांना अंगावर कशी पाजणार आणि त्यांचें संगोपन तें काय करणार ? तेव्हा जिवंत राहिलेलीं मुलें तरी कशीं चांगलीं होणार ? आर्थिक दृष्ट्या पहातां १४ पैकी ९ वेळां गरोदरपणाचा व बाळंतपणाचा खर्च फुकट गेला ( तिचा खासगी की सार्वजनिक हा मुद्दा नाही ). मेलेल्या ९ मुलांकरतां आणखी खर्च झाला असेल तो फुकट गेला. ज्या घरांत उंदीर मुलांना मारूं शकतात अशा ठिकाणीं कदाचित् मोठ्या खटपटीने आणि काटकसरीने २ मुलांना जेमतेम वाढवतां आलें असतें. त्याऐवजी १४ मुलांचे हाल झाले. जन्म देण्यापुरती आई आणि पुढे काळजी घ्यायला मात्र कोणी नाही, कारण त्याच स्थितींत आईला घरांतलें काम करावेंच लागणार. गरिबांना नोकर कोठले ?

तेव्हा या श्रीमंत अमेरिकनाने समाजाविरुद्ध गुन्हाच केला नाही तर काय ? याहून आणखी अनीति ती कशी असायची ? फ्रान्सलाही यापासून धडा घेण्यासारखा आहे, कारण येथेही जास्त मुलें झाल्यास बक्षिस मिळतें आणि अशीं उदाहरणें पाहूनही ज्यांना संततिनियमनाचें महत्व कळत नाही ते मनुष्य कसले ? पशूच ते. फ्रान्समधील संततिनियमनाविरुद्ध कायदा पाशवी आहे. त्याने मुलांचें संरक्षण न होतां फक्त गर्भाचें किंवा स्त्रीबीजांचें संरक्षण होतें. मूल झाल्यानंतर त्यांचें पुढें काय होतें हें कायदा पहात नाही. गरिबीमुळे किंवा लोकलज्जेमुळे बालहत्या करणाऱ्या स्त्रांवर देखील जूरी दया करते, पण त्याच कारणांकरता गर्भपात केल्यास मात्र कधीही दया होत नाही. सरकारची सर्व माया गर्भावर खर्च झाल्यामुळें मुलांकरता बिलकुल शिल्लक रहात नाही. आईबापांनी मुलांचे हाल केले तरी त्यांना फारशी शिक्षा होत नाही. वास्तविक पाहिलें तर मुलांचे हाल करणाऱ्या आईबापांवर जबरीने शस्त्रक्रिया करून त्यांना पुनः मुलें होणार नाहीत अशी व्यवस्था केली पाहिजे. आईबाप दारुडे असल्यामुळें किंवा त्यांनी अत्याचार केल्यामुळे जर मुलांना घर सोडावें लागलें, तर त्यांची कोणी दाद घेत नाही,

भूक लागल्यामुळे त्यांनीं पावाचा तुकडा चोरला तर त्यांना तुरुंगांत मात्र जावें लागतें. सरकारकडे यासंबंधीं अर्ज केल्यास उत्तर मिळतें की अशांना जरूर आश्रय मिळाला पाहिजे, परंतु हें सरकारचें काम नाही, तें खासगी मदतीनें झालें पाहिजे. एका मुलीला सावत्र बापानें घरीं त्रास दिल्यामुळे तिनें घर सोडलें आणि रस्त्यांत फिरत असतां एका तरुणाने तिजवर दया केली. पण १५ दिवसांनीं त्याने तिला वेश्यावृत्तींत घातलें. एके दिवशीं तिने दोन तास धंदा करून त्याला ६० फ्रँक नेऊन दिले आणि नंतर झोप घेण्याचा तिचा बेत होता. पण पैसे पुरेसे मिळाले नाहीत म्हणून त्याने तिला मारून रात्रभर धंदा करायला लावलें.

संततिनियमनाविरुद्ध फ्रान्समधील कायदा किती हास्यास्पद आहे, हें पुढील उदाहरणावरून समजेल. गुप्तरोगप्रतिबंधाकरता म्हणून ज्या रबरी पिशव्या पुरुषांना उघडपणें बाजारांत विकत मिळतात, त्यांनी संततिनियमनही होतें हें सर्वांस माहीत आहे. पण स्त्रियांना रोगप्रतिबंधाचे मार्ग शिकवतां येत नाहीत, कारण त्या मार्गांनीं संततिप्रतिबंध होईल. म्हणजे पुरुषांना संततिप्रतिबंध करण्याची परवानगी आहे पण स्त्रियांना नाही, पुरुषांना जी सबब चालते ती स्त्रियांना चालत नाही. ज्या रोगप्रतिबंधाचा सरकारतर्फे प्रचार होतो, त्याला स्त्रियांचे बाबतींत मात्र परवानगी नाही, कारण त्याने संततिप्रतिबंध होईल. आणि कायदे करणारांना मोठे विद्वान समजतात !

---

# इंग्लंडांत घटस्फोटाचा नवीन कायदा

'न्यू जनरेशन' वरून

नुकत्याच पास झालेल्या नवीन कायद्यासंबंधी पुष्कळ लोकांची अशी कल्पना आहे की त्याने कांही सुधारणा झाली आहे, पण आजपासून एका वर्षांत सर्वांना कळेल की हा कायदा अत्यंत जाचक आहे. एकतर लग्न झाल्यापासून चार वर्षेंपर्यंत कोणालाही घटस्फोट मिळणार नाहीं. ही मुदत कायद्यांत तीन वर्षें लिहिली असली तरी फिर्याद करून तिचा अखेरचा निकाल मिळेपर्यंत आणखी एक वर्ष सहज जातें. असा कायदा आजपर्यंत कोणत्याही देशांत झालेला नाही. जेथे जेथे

घटस्फोट मिळतो तेथे योग्य कारणानें तो ताबडतोब मागण्याचा हक्क असतो. पुष्कळ वेळां विवाह यशस्वी होणार नाही हें ताबडतोब कळतें. नुकतेंच एका खटल्यांत डॉ. मॉड् रॉयडन् यांनी अशी साक्ष दिली कीं लोकांना कामशिक्षण बिलकुल नसल्यामुळ पुष्कळ वेळां प्रथम रात्रींच विवाहित जोडप्याचा कायमचा बेबनाव होतो. अशा लोकांना चार वर्षे थांबायला लावणें म्हणजे भयंकर शिक्षा आहे. चार वर्षे म्हणजे तारुण्याचा बराच मोठा तुकडा आहे, आणि त्यांत आणखीही एक गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे की घटस्फोट व्हावयाचा असेल तर तो मुलें होण्यापूर्वीच झालेला बरा. (तीन वर्षांत मुलें होऊन घटस्फोटांत आणखी एक अडचण उत्पन्न व्हावी हा कायद्याचा एक उद्देशच आहे. **संपादक**)

खरें म्हटलें तर कायद्यांत असेंही एक कलम आहे की कांही विशेष जरूरीचें कारण दिसल्यास पहिल्या तीन वर्षांतही घटस्फोट द्यावा, परंतु बहुतेकांना याचा फायदा मिळणार नाही, कारण जज्जाला विशेष कारण वाटेल की नाही याची वानवा असतांना खटला करण्याचा खर्च करायला फक्त श्रीमंत लोकच तयार होतील, आणि त्यांनाच याचा फायदा कदाचित् मिळेल. लोकांचे हक्क कायद्यानें स्पष्ट सांगितले पाहिजेत, ते जज्जाचे मर्जीवर राहतां नयेत.

जेव्हां दोघांनाही घटस्फोट पाहिजे असेल तेव्हा तो मिळणें या कायद्यानें पूर्वीपेक्षा कठिण केलें आहे. पूर्वी कृत्रिम पुरावा तयार केला म्हणजे भागत असे. परंतु आतां खटला दोघांच्या संगनमतानें केलेला नाही याबद्दल पुरावा द्यावा लागेल (हा पुरावा कसा असावा हें निश्चित नाही. **संपादक**). हल्लीं बहुतेक देशांत लोकमत असें आहे की जेव्हा दोघांनाही घटस्फोट पाहिजे असेल तेव्हा तर तो जरूर दिला पाहिजे, आणि कांही देशांत तो तसा देतातही. पण ब्रिटिश पार्लमेंटाला दोघांचें संगनमत ही भयंकर गोष्ट वाटते, आणि अशा वेळीं तो मिळतांच नये असा कायद्याचा उद्देश आहे.

हा कायदा सर्वस्वी वाईट नाही, आणि कांही लोकांना त्यापासून फायदा होईल, पण बहुतेकांना तो नापसंत होईल, आणि धर्मगुरूंची लुडबूड चालू न देतां त्यांत सुधारणा केली पाहिजे ही ओरड पूर्वीपेक्षाही अधिक जोरानें चालू राहील.